# जनसंपर्क अधिकारी
# मिरा-भाईदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय
# यांचे कार्यालय

सेक्टर ५, रामनगर, शान्ती गार्डन, मिरा-रोड पुर्व ठाणे - ४०११०७
फोन नबंर -०२२-२९४५१००३
Email ID - pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


दिनांक १४/०३/२०२१

**-----ooo प्रेस नोट ooo---**

**रस्यावरील रहदारीची जाणीव असताना निष्काळजी व भरधाव वेगाने वाहन चालविण्यांवर भांईदर पोलीसांनी गुन्हा दाखल करुन २४ तासात दोषारोप सादर केले व मा. न्यायालयाने शिक्षा सुनावली.**

भांईदर पोलीस ठाणे दि. १२/०३/२०२१ रोजी रात्री ०३.०० वा. चे सुमारास भांईदर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील झायका हॅाटेल समोर, सार्वजनिक रोडवर हयुंडाई क्रेटा चार चाकी वाहन क्रमांक एमएच ०४ केटी १४०५ हे वाहन ईसम नामे केविन शशीकांत शहा हा भरधाव वेगाने, हायगयीने व निष्काळजीपणे वाहन चालवित होता. त्यास पोलीसांनी थांबण्याचा ईशारा करुन देखील वाहन न थांबवता पळून गेला असता त्याचा पोलीसांनी पाठलाग करुन त्यास पकडले व सदर ईसमाकडे तो चालवित असलेल्या सदर चार चाकी वाहनाचे कागदपत्र मागितले असता त्याने ते सादर न केल्याने सदर ईसमावर भारतीय दंड विधान कलम २७९ व मोटर वाहन कायदा कलम १८४, १८५, २२/१७७ प्रमाणे कारवाई करुन सदर ईसमावर २४ तासात मा. न्यायालयात दोषारोप सादर केले असता मा. न्यायालयाने सदर ईसमास द्रव्यदंड रु २,२००/- इतकी शिक्षा सुनावली आहे.

सदर कारवाई ही श्री. अमित काळे सो., पोलीस उप आयुक्त, परीमंडळ – १, मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व श्री. शांतीलाल जाधव सो., सहाय्यक पोलीस आयुक्त, भांईदर विभाग यांचे सुचनेनुसार भांईदर पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत द. भोसले, पो. उप. निरी. किशोरकुमार नेवसे व स्टाफ यांनी केलेली आहे.